**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२५४**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : १९ सप्टेंबर, २०१७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या २५४व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस,<br>वरळी, मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री. ना. वि. मेराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०२५. | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

..२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xox----------

**<u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २५४वी बैठक</u>**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **२८ ऑगस्ट, २०१७ (सोमवार)** |
| **वेळ** | **:** | **दुपारी ४.०० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२** |

**<u>उपस्थित सदस्य :</u>**

| | | |
|---|---|---|
| श्री. सुमीत मल्लिक<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. संजयकुमार<br>अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री. अजोय मेहता<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**<u>निमंत्रित :</u>**

श्रीमती वंदना कृष्णा
प्रधान सचिव,
(अपर मुख्य सचिव यांचे प्रतिनिधी),
वित्त विभाग

श्री. प्रविण दराडे
अति.महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय यादव
सह-महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..२/-

श्री.पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अडुसुमिल्ली
प्रमुख,
नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती विजयालक्ष्मी
प्रमुख,
परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. टी. ठुबे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. भा. गाडगे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. अ. रा. वानखेडे
उप-महानगर आयुक्त,
भूमि व मिळकत शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
उप-महानगर आयुक्त (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव,
कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २६ मे, २०१७ रोजी झालेल्या २५३व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २६ मे, २०१७ रोजी झालेल्या २५३व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा संकल्पांतर्गत "भारत डायमंड कंपनी, वांद्रे-कुर्ला संकुल ते वाकोला जंक्शन येथे जोडणारा उन्नत मार्ग बांधणे" या कामाच्या निविदेस मान्यता देणेबाबत.**

३.१ महानगर आयुक्तांनी असे नमुद केले की, मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत भारत डायमंड (कंपनी), वांद्रे-कुर्ला संकुल ते वाकोला जंक्शन येथे जोडणारा उन्नत मार्ग बांधणेच्या कामास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दि. २१/०७/२०१५ रोजी झालेल्या २४५व्या बैठकीमध्ये रु. २६३.०९ कोटी इतक्या अंदाजित किंमतीच्या खर्चास प्राधिकरणाची प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शिफारस केली होती. तद्नंतर प्राधिकरणाच्या दिनांक २६/०८/२०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीत ठराव क्रमांक १३४२ अन्वये सदर किंमतीच्या

खर्चास प्रशासकीय मान्यता दिली. सदर उन्नत मार्गाची लांबी २.२ कि.मी. व रुंदी १७.५ मी. (चार मार्गिका) इतकी आहे.

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, मे. आकार अभिनव कंन्स्ल्टंट प्रा. लि., या सल्लागाराने सादर केलेल्या सविस्तर प्रस्तावाची छाननी केल्यानंतर रु.२४५.९१ कोटी इतक्या अंदाजित किंमतीची एक रकमी पध्दतीची (Lumpsum) ई-निविदा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर, तसेच मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये दिनांक ३१/१२/२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली. त्यास प्रतिसाद म्हणून एकुण १० निविदाधारकांनी प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरुन निविदा प्राप्त केल्या व त्यापैकी ०४ निविदाकारांनी ई-निविदेच्या नियमावलीप्रमाणे संपूर्ण निविदा भरली. सदर ०४ निविदाकारांची नावे खालीलप्रमाणे आहेत :-

१) मे.जे.एम.सी. लिमिटेड

२) मे.निरज सिमेंट स्ट्रक्चरल लिमिटेड

३) मे. एन.सी.सी.लिमिटेड

४) मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लिमिटेड

सविस्तर निविदा सुचनेमध्ये विहित केलेल्या पात्रता निकषास अनुसरुन लिफाफा 'अ' व अहवाल 'ब' मध्ये निविदाकाराने सादर केलेल्या कागदपत्राची छाननी करुन सदर अहवाल निविदा मुल्यांकन समितीकडे (Bid Evaluation Committee) सादर करण्यात आला. अति. महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निविदा मुल्यांकन समितीची बैठक दिनांक १९/०६/२०१७ रोजी झाली. निविदा मुल्यांकन समितीच्या मान्यतेच्या अनुषंगाने पात्र ठरलेल्या ४ निविदाकारांचा आर्थिक देकार असलेले लिफाफा 'क' बिनांक २१/०६/२०१७ रोजी उघडण्यात आले व त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | बोली क्षमता (Bid Capacity) (रु.कोटी) | आर्थिक देकार रक्कम (रु.कोटी) | टक्केवारी दर निविदेमधील अंदाजित खर्चाच्या तुलनेत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे.जे.एम.सी.लि. | २६५४/- | २८७.१० | (+) १६.७५% अधिक | चतुर्थ लघुत्तम |
| २. | मे.निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि. | २२९०/- | २२०.८९ | (-) १०.१७% कमी | प्रथम लघुत्तम |

..५/-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | मे. एन.सी.सी.लि. | ३६७६३/- | २६२.८८ | (+) ६.९०% अधिक | तृतिय लघुत्तम |
| ४. | मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. | १५२१/- | २२९.०० | (-) ६.८७% कमी | द्वितीय लघुत्तम |

३.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, प्राप्त देकारात मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि. यांचा रु.२२०.८९ कोटी इतक्या किंमतीचा प्रथम लघुत्तम आर्थिक देकार होता. सदर आर्थिक देकार हा कामाच्या अंदाजित किंमतीच्या (-) १०.१७% कमी असल्याने याबाबतचे स्पष्टीकरण मे.निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि. यांचेकडून मागविण्यात आले. मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि. यांनी त्यांच्या दिनांक २८/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये खालील बाबींकरीता देकार कमी किंमतीचा असल्याचे स्पष्टीकरण सादर केले :-

अ) पुलाचे बहुतांशी लांबीचे काम हे विद्यापिठाच्या मोकळया जमीनीवरुन असल्याने सेवा वाहिन्यांचे स्थलांतरण व वाहतुक रहदारी यामुळे होणा-या वरकड (overhead) खर्चामध्ये अंदाजे ५% ची बचत होणार आहे;

ब) कंत्राटदाराकडे सद्य:स्थितीत पुरेशा प्रमाणात यंत्रसामुग्री, शटरिंग मटेरिअल इ. गोष्टी असल्याने त्यांच्या खर्चामध्ये अंदाजे ६% ची बचत होणार आहे.

क) अशाप्रकारे एकूण ११% बचत विचारात घेता कंत्राटदाराने त्याचा देकार १०.१७% कमी दिलेला आहे.

३.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही नमूद केले की, उपरोक्त बाबींची पडताळणी मे.आकार अभिनव सल्लागार यांचेमार्फत करण्यात आली. तद्नंतर संपूर्ण प्रस्ताव निविदा समितीच्या दिनांक २६/०७/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत सादर करण्यात आला. निविदा समितीने सदर प्रस्तावास मान्यता दिली व सदर प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

**निर्णय : त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावाला मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३२८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उप-कलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा

आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत "भारत डायमंड कंपनी, वांद्रे-कुर्ला संकुल ते वाकोला जंक्शन येथे जोडणारा उन्नत मार्ग बांधणे" या कामाच्या मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि. यांच्या रु.२२०.८९ कोटी म्हणजेच अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (-) १०.१७% कमी किंमतीच्या आर्थिक देकारास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.४ : मार्वे-भाईंदर-घोडबंदर रोड, (जिल्हा ठाणे) हया प्रस्तावित सागरी किनारा महामार्गाच्या कामाचे तांत्रिक-आर्थिक, वित्तिय व्यवहार्यतेचा अभ्यास करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन निविदा प्रक्रिया व्यवस्थापन करणेसाठी सल्लागाराची नेमणूक करणे.**

४.१ महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशातील बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे महानगरातील पश्चिम तटीय भागातील वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने नरीमन पॉईट ते गिरगाव-वांद्रे-वर्सोवा- मार्वे-कांदिवली असा सागरी किनारा मार्ग प्रस्तावित केला आहे. सदर मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. मुंबई महानगर प्रदेशातील पश्चिम सागरी किनारा भागातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावित सागरी मार्गाच्या धर्तीवर मार्वेपासून पुढे मनोरी-गोराई-मिरा भाईंदर-घोडबंदर ठाणे जिल्हयापर्यंत सदर प्रस्तावित सागरी मार्गाचा विस्तार करणे, मुंबई महानगर प्रदेशाचा विकास व वाहतूकीच्या दृष्टीने आवश्यक होणार आहे. तसेच मा.मुख्यमंत्री कार्यालय, यांचेकडून दिनांक ०३/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये गिरगांव चौपाटी ते वर्सोवा मार्वे, हा प्रस्तावित सागरी मार्ग यापुढे ठाणे घोडबंदर पर्यंत विस्तारीत करण्याच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन मान्यतेसाठी सादर करावा, असे प्राधिकरणास आदेश दिले होते.

..७/-

४.२ महानगर आयुक्त यांनी वरील बाबींच्या अनुषंगाने अशी माहिती दिली की, प्राधिकरणातर्फे सदर कामाच्या पुर्ततेसाठी जागतिक स्तरावरील सल्लागार नेमण्याची प्रक्रिया दिनांक ०५/०१/२०१७ रोजी प्रथम ई-निविदेद्वारे आरंभ करण्यात आली होती. तथापि, अंतिमत: फक्त एकच निविदा प्राप्त झाल्याने ई-निविदा प्रक्रियेच्या नियमावलीनुसार दिनांक २३/०३/२०१७ रोजी फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार निविदा प्रक्रियेअंती दोन निविदा प्राप्त झाल्या. निविदेतील अटीनुसार करण्यात आलेल्या आर्थिक मुल्यांकनाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

| **अ. क्र.** | **निविदाधारकाचे नाव** | **तांत्रिक गुण** | **आर्थिक देकार रक्कम रु.** | **आर्थिक गुणसंख्या (SF)=१००x Fm/F** | **एकूण गुणसंख्या S=०.८०xS(T)+ ०.२०xS(F)** | | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | | ७ |
| १. | स्टुप — दारशा कन्सोर्शियम (Stup-Darashaw Consortium) | ९३.५० | ९.२२ कोटी | Fm | १०० | ९४.८० | प्रथम लघुत्तम |
| २. | पेन्टाकल कन्सलटंट (इं) प्रा.लि.- प्रोजोन प्रोजेक्टॉस कन्सोर्शियम | ९२.५० | १२.४९ कोटी | F | ७३.८२ | ८८.७६ | द्वितीय लघुत्तम |

यानुसार मे.स्टुप-दारशा कन्सोर्शियम यांचा आर्थिक देकार रु.९.२२ कोटी एवढा असून ती लघुत्तम आहे. तसेच तांत्रिक गुण हे ९३.५० एवढे असून ते इतर निविदाकारांपेक्षा अधिक आहेत. त्यानुसार निविदेतील अटीप्रमाणे मे.स्टुप- दारशा कन्सोर्शियम यांचे एकत्रित असलेले तांत्रिक व आर्थिक गुणसंख्या ही ९४.८० इतकी असल्यामुळे त्यांचा प्रस्ताव प्रथम प्राधान्यावर आहे व तो कार्यकारी समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

४.३ सदर बाबींवर भाष्य करताना श्री.अजोय मेहता, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सागरी किनारी मार्गाच्या कामात मे.स्टुप कन्सल्टंट यांच्याकडून ब-याच प्रमाणात दिरंगाई करण्यात आली होती व त्यांची कामगिरी अपेक्षेप्रमाणे समाधानकारक दिसून आली नाही. यावर महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्राधिकरणास सदर निविदा या द्वितीय निविदा प्रक्रियेअंती प्राप्त झाल्या असून सदर

कामाची निविदा जागतिक स्तरावर मागविण्यात येऊन देखील फारसा प्रतिसाद दिसला नाही. तथापि, मे.स्टुप कन्सल्टंट-दारशा कन्सोर्शियम यांनी निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता केली असल्याने व त्यांची निविदा लघुत्तम व प्रथम प्राधान्याची असल्याने मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात आली आहे.

<u>**निर्णय :**</u> <u>**त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**</u>

<u>**ठराव क्र.१३२९ :**</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६चे उपकलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे विषयांकित, मार्वे-भाईंदर-घोडबंदर रोड (ठाणे जिल्हा) या सागरी किनारी मार्गाच्या कामाचे तांत्रिक, आर्थिक, वित्तीय व्यवहार्यतेचा अभ्यास करुन सविस्तर प्रकल्प अहवाल आणि निविदा प्रक्रिया व्यवस्थापन करण्यासाठी जागतिक दर्जाचे सल्लागार नेमण्याच्या ई-निविदा प्रक्रियेअंती प्राप्त झालेला मे.स्टुप-दारशा कन्सोर्शियम या सल्लागाराच्या सुमारे रु.९.२२ कोटी एवढया किमंतीच्या (प्रथम प्राधान्याचा व लघुत्तम) निविदा देकारास मान्यता प्रदान करत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>**बाब क्र.५ :**</u> <u>**विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ठाणे-बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र.४ पर्यंतच्या रस्त्याच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या लघुत्तम निविदेस मान्यता मिळणेबाबत.**</u>

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देतांना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत रस्त्यांची बांधकामे व रुंदीकरण तसेच पुलांची कामे हाती घेण्याचे ठरले व त्यात

ऐरोली कटाई नाका या एकूण १२.३ कि.मी लांबीच्या प्रकल्पाचा अंतर्भाव असून प्राधिकरणाच्या दिनांक २७/०६/२०१४ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीत सदर प्रकल्पासाठी एकूण रु. ९४४.२० कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे विकसन योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने आखणी मार्ग तीन भागात विभागण्यात आला असून त्यातील भाग क्र. १ ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ असा एकूण ३.५० कि.मी. लांबीचा आहे. सदर प्रकल्पासाठी याआधी मे.स्टुप कन्सल्टंट प्रा.लि. आणि मे. अरनेस्ट व यंग (सहभागीदार) यांची प्रकल्पाच्या कार्यारंभाचा आदेश देईपर्यंतच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आली होती. यास्तव प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्याच्या दृष्टीने ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. ई-निविदेच्या प्रतिसादार्थ एकूण पाच निविदाकारांनी त्यांचे देकार सादर केले. निविदा परिशिष्टात नमूद तारखेनुसार सर्व निविदाकारांचे लिफाफा - 'अ' उघडण्यात आले व त्यातील अटी सर्वांनी पूर्ण केल्यामुळे सर्व म्हणजे पाच निविदाकारांचे लिफाफा - 'ब' उघडण्यात आले. लिफाफा - 'ब' प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या पात्रतेच्या अटीनुसार लिफाफा 'ब' मधील दस्ताऐवजांची छाननी करण्यात आली. सदर छाननीनुसार सर्व निविदाकारांना ७५ पेक्षा जास्त गुण प्राप्त झाल्यामुळे सर्व निविदाकार लिफाफा - 'क' (आर्थिक देकार) उघडण्यासाठी पात्र झाले. गुणांचे विवरण हे खालीलप्रमाणे :-

| **अ. अर्हता निकष** अर्हतेनुसार खालील मुद्देनिहाय दयावयाचे गुण | | मे. स्टुप कन्सल्टंटस् प्रा.लि. | मे. पीईएमएस इंजिनिअरींग कन्सल्टंटस् प्रा.लि. व मे. आकार अभिनव कन्सल्टंटस् प्रा.लि. (सहभागीदार) | मे. एईकॉम एशिया कं.लि. | मे. बेव्हर इन्फ्रा कन्सल्टंटस् प्रा.लि. | मे. युरोस्टुडीओस् एस. एल. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **विवरण** | **गुण** | | | | | | |
| संस्थेची स्थापना, मागील ७ वर्षातील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार आणि प्रुफ कन्स्लटंट म्हणून प्रस्तावित कामांशी सुसंगत केलेली कामे तसेच मागील ३ वर्षातील सरासरी आर्थिक उलाढाल | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| निविदा संचात नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावित केलेली कामे पूर्ण करण्याची पद्धत आणि नियोजन याची योग्यता. | २५ | १३ | ०७ | ११ | ११ | १० | |
| कामावरील मुख्य व्यक्तींची शैक्षणिक अहर्ता तसेच कामाशी निगडीत अनुभव | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० | |
| **एकूण गुण** | **१००** | **८८** | **८२** | **८६** | **८६** | **८५** | |

त्यानुसार पाचही निविदाकारांचा आर्थिक देकार दिनांक ०८/०६/२०१७ रोजी उघडण्यात आला. निविदाकारांकडून आलेल्या दरांचा तक्ता खालीलप्रमाणे :

| **अ.क्र.** | **सल्लागाराचे नाव** | **नमुद केलेला दराचा टक्का** | **नमूद टक्याप्रमाणे रक्कम (रुपये)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १ | मे. पीईएमएस इंजिनिअरींग कन्सल्टंटस् प्रा.लि. व मे. आकार अभिनव कन्सल्टंटस् प्रा.लि. (सहभागीदार) | १.९६ | ८,८९,३५,०००/- | प्रथम लघुत्तम |
| २ | मे. एईकॉम एशिया कं.लि. | २.६१८ | ११,८७,९१,७५०/- | |
| ३ | मे. बेव्हर इन्फ्रा कन्सल्टंटस् प्रा.लि. | २.९७ | १३,४७,६३,७५०/- | |
| ४ | मे. युरोस्टुडीओस् एस. एल. | २.९७ | १३,४७,६३,७५०/- | |
| ५ | मे. स्टुप कन्सल्टंटस् प्रा.लि. | ३.० | १३,६१,२५,०००/- | |

सदर तक्त्याप्रमाणे मे. पीईएमएस इंजिनिअरींग कन्सल्टंटस् प्रा. लि. व मे. आकार अभिनव कन्सल्टंटस् प्रा. लि. (सहभागीदार) यांचा १.९६ % इतका देकार लघुत्तम आढळून आला.

तद्नंतर, निविदेतील तरतूदीनुसार सर्व निविदाकारांचा तांत्रिक व आर्थिक एकत्रित देकाराची निविदेत दिलेल्या सुत्रानुसार पडताळणी करण्यात आली (पडताळणीचा तक्ता खालीलप्रमाणे) :-

| अ.क्र. | सल्लागाराचे नाव | तांत्रिक व आर्थिक एकत्रित देकारानुसार गुण | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. पीईएमएस इंजिनिअरींग कन्सल्टंटस् प्रा.लि. व मे. आकार अभिनव कन्सल्टंटस् प्रा.लि. (सहभागीदार) | ८५.६० | अधित्तम गुण |
| २ | मे. एईकॉम एशिया कं.लि. | ८३.७७ | |
| ३ | मे. बेव्हर इन्फ्रा कन्सल्टंटस् प्रा.लि. | ८१.२० | |
| ४ | मे. युरोस्टुडीओस् एस. एल. | ८१.२० | |
| ५ | मे. स्टुप कन्सल्टंटस् प्रा.लि. | ८३.४७ | |

५.२ उपरोक्त तक्त्यानुसार मे. पीईएमएस इंजिनिअरींग कन्सल्टंटस् प्रा.लि. व मे. आकार अभिनव कन्सल्टंटस् प्रा.लि. (सहभागीदार) यांना अधित्तम म्हणजे ८५.६ इतके गुण प्राप्त झाले व निविदेतील तरतुदीनुसार त्यांना वाटाघाटीसाठी पाचारण करण्यात आले असता त्यांच्या पत्र क्र. निरंक, दिनांक १९/०६/२०१७ नुसार आणखी दर कमी करण्यास असमर्थता दर्शविली. तद्नंतर, अति. महानगर आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली गठीत असलेल्या निविदा शिफारस समितीच्या दिनांक १४/०७/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत मे. पीईएमएस इंजिनिअरींग कन्सल्टंटस् प्रा.लि. व मे. आकार अभिनव कन्सल्टंटस् प्रा.लि. (सहभागीदार) यांचा कामाच्या कंत्राटाच्या खर्चाच्या १.९६% इतका देकार मंजूर करण्याची शिफारस झाली.

५.३ महानगर आयुक्तांनी सादर केलेल्या माहितीवर चर्चा होऊन, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मे. पीईएमएस इंजिनिअरींग कन्सल्टंटस् प्रा.लि. व मे. आकार अभिनव कन्सल्टंटस् प्रा.लि. (सहभागीदार) यांचा लघुत्तम देकार निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करणारा व सुसंवादित असल्याने सर्व सदस्यांनी त्यास मान्यता दिली.

..१२/-

**निर्णय :** **चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३३० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे ठाणे बेलापूर मार्ग ते राष्ट्रीय महामार्ग क्र ४ च्या दरम्यानच्या रस्त्याच्या बांधकामासाठी मे. पी ई एम एस इंजिनिअरींग कन्सल्टंट प्रा. लि. व मे. आकार अभिनव कन्सल्टंटस् प्रा. लि. (सहभागीदार) यांचा लघुत्तम देकार असलेली निविदा जी की, कामाच्या कंत्राटाच्या खर्चाच्या १.९६ % इतकी म्हणजे सध्याच्या अंदाजित रक्कमेनुसार रु. ८,८९,३५,०००/- (रुपये आठ कोटी एकोणनव्वद लक्ष पस्तीस हजार) इतक्या रक्कमेचा देकार तसेच (सदर बाबत निविदेतील तरतुदीनुसार सल्लागारांची फी ही निविदेत नमुद केलेली अंदाजित रक्कम किंवा कामाचा मंजूर खर्च (Tendered cost) यापैकी न्युनतम किंमतीनुसार असेल.) स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या खर्चास अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ :** **विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ठाणे-बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र.४ पर्यंतच्या उन्नत रस्त्यासाठी संकल्पचित्र व बांधकाम (Design Built) तत्वावर ठोक रक्कम पध्दतीने करावयाच्या कामाच्या लघुत्तम निविदेस मान्यता मिळण्याबाबत.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देतांना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत रस्त्यांची बांधकामे व रुंदीकरण तसेच पुलांची कामे हाती घेण्याचे ठरले व त्यात ऐरोली कटाई नाका या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या प्रकल्पाचा अंतर्भाव असून प्राधिकरणाच्या दिनांक २७/०६/२०१४ रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीत सदर प्रकल्पासाठी एकूण रु. ९४४.२०

कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे विकसन योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने आखणी मार्ग तीन भागात विभागण्यात आला असून त्यातील भाग क्र. १ ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ असा एकूण ३.५० कि.मी. लांबीचा आहे. सदर भाग-१ मधील उन्नत मार्गाच्या एकूण रॅम्पसहित २,३९२ मीटर लांबी असलेल्या व रु. १३५,२१,१२,५३१/- अंदाजित रक्कमेच्या कामासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर ई-निविदेच्या प्रतिसादार्थ लिफाफा - 'अ' उघडला असता मे. जे. एम. सी. प्रोजेक्टस् इंडिया लि. व मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. या दोनच निविदाकारांनी त्यांचा देकार सादर केल्याचे दिसून आले. स्पर्धात्मक दर प्राप्त होण्याच्या दृष्टीने देकारात तीन पूर्व अहर्ता व निकष पूर्ण करणा-या निविदा प्राप्त असल्यास निविदा प्रक्रिया पुढे नेता येत असल्यामुळे प्राप्त झालेल्या दोनही निविदा रद्द करुन प्रथम निविदा रद्दबादल ठरविण्यात आली.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, तद्नंतर पुन:श्च ई-निविदा प्रसिद्ध केल्या असता त्यास प्रतिसादार्थ एकूण चार निविदाकारांनी त्यांचे देकार सादर केले. सर्व निविदाकारांनी निविदेतील अटींची पुर्तता केल्यामुळे त्याचे ई- लिफाफा - 'ब' उघडण्यात आले. लिफाफा - 'ब' मधील दस्ताऐवजांची पडताळणी केली असता मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरलस् लि. यांनी त्यांचा प्रस्ताव हा प्रथम निविदा सुचनेनुसार सादर केल्याचे दिसून आले. प्रथम निविदा व व्दितीय निविदा यांतील अटींमध्ये फरक असल्यामुळे मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरलस् लि. यांचा देकार व्दितीय निविदेनुसार असलेल्या अटी व शर्तीनुसार विसंगत असल्याने रद्दबादल ठरविण्यात आला. मे.निरज सिमेंट स्ट्रक्चरलस् लि. वगळता इतर तीन निविदाकांराचे लिफाफा - 'क' (आर्थिक देकार) उघडण्यात आले त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | आर्थिक देकार रक्कम (रु.) | दराची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. जे. एम. सी. प्रोजेक्टस् इंडिया लि. | १५१,००,००,०००/- | ११.६७ % | |
| २ | मे. एस. एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | १४५,००,००,०००/- | ७.२४ % | प्रथम लघुत्तम |
| ३ | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. | १४५,९०,५१,११०/- | ७.९० % | |

६.३ वरील तपशिलानुसार मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा रु. १,४५,००,००,०००/- किंमतीच्या आर्थिक देकार जो की, निविदेमध्ये नमुद अंदाजित किंमतीच्या आर्थिक देकार जो की निविदेमध्ये नमुद अंदाजित किंमतीच्या ७.२४% अधिक इतक्या दराचा लघुत्तम आढळून आला. सदर लघुत्तम दर अंदाजित रक्कमेपेक्षा जास्त असल्याकारणाने मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना त्याबाबत खुलासा तसेच वाटाघाटी करण्यासाठी पाचारण केले असता त्यांच्या पत्र क्र. SMCIPL/Tender/General/MP/2017-18/3 दिनांक 02/05/2017 नुसार रु. १४४,४७,००,०००/- इतक्या रक्कमेत म्हणजेच अंदाजित रक्कमेच्या ६.८४% इतक्या अधिक दराने त्यांनी काम करण्याचे मान्य केले. अति. महानगर आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या निविदा शिफारस समितीच्या दिनांक १४/०७/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांच्या रु. १४४,४७,००,०००/- इतका अंदाजित किंमतीपेक्षा ६.८४% अधिक दराचा देकार मंजूर करण्याची शिफारस करण्यात आली.

६.४ महानगर आयुक्तांनी सादर केलेल्या माहितीवर चर्चा होऊन बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा लघुत्तम देकार निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करणारा व सुसंवादित असल्याने सर्व सदस्यांनी त्यास मान्यता दिली.

**<u>निर्णय :</u>** **<u>चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र.१३३१ :</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती यांव्दारे ठाणे बेलापूर मार्ग ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ च्या उन्नत रस्त्याच्या संकल्पचित्र व बांधकाम (Design Built) तत्वावर ठोक रक्कम पद्धतीने करावयाच्या प्रस्तावित कामासाठी मे. एस.एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची लघुत्तम देकार असलेली निविदा ज्याची वाटीघाटी पश्चात रक्कम रु. १४४,४७,००,०००/- (रुपये एकशे चव्वेचाळीस कोटी सत्तेचाळीस

लाख फक्त) इतकी असून जी की अंदाजित रक्कम रु. १३५,२१,१२,५३१/- पेक्षा ६.८४ % टक्के अधिक दराने आहे ती स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणारी भाववाढ, इ. अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुंबई-पुणे (जुन्या) राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वर नावडेफाटा जंक्शन येथे उड्डाणपुलाचे संकल्पन व बांधकाम करणे तसेच रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करणे या कामांच्या लघुत्तम ई-निविदेस मान्यता मिळणेबाबत.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदर विषय मागे घेण्यात आला.

**बाब क्र.८ : मेट्रो मार्ग -४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली या मेट्रो मार्गाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची (General Consultant) नियुक्ती करण्याबाबत.**

८.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीत तसेच दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबई मेट्रो मार्गांची पुढील ३ ते ४ वर्षात ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरित अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळाली असून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याकरीता अंदाजे रु. ३५,४०० कोटीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यापैकी मेट्रो मार्ग ४ साठी अंदाजीत केलेल्या ₹ १४,५४९ कोटी प्रकल्प किंमतीच्या खर्चास प्राधिकरणाच्या दिनांक ३ जून, २०१६ रोजीच्या १४०व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली असून दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रकल्पास मान्यता मिळाली आहे. वरील कामांकरिता साधारण सल्लागार (GC) नेमणूकीसाठी अंदाजपत्रके व मसुदा निविदा दिल्ली मेट्रो रेल महामंडळ DMRC मार्फत तयार

करुन घेतल्या होत्या. निविदापत्रकानुसार साधारण सल्लागारांकडून प्रामुख्याने खालील सेवा अपेक्षित आहेत :-

१. मेट्रो मार्ग ४ च्या स्थापत्य कामांची दैनंदिन देखरेख करणे.

२. मेट्रो मार्ग ४च्या डेपोच्या स्थापत्य कामांचे व प्रणाली कामांची (System Works) दैनंदिन देखरेख करणे.

३. मेट्रो मार्ग ४ च्या कामांची चाचणी सुरु करणे.

८.२ महानगर आयुक्त यांनी माहिती देताना असेही सांगितले की, वरील मेट्रो मार्गांच्या कामी साधारण सल्लागाराची नियुक्ती करण्याकरीता ई-निविदा मागविण्यासाठी नवभारत टाईम्स, हिंदुस्थान टाईम्स व लोकमत या वृत्तपत्रात दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पूर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख २६ एप्रिल, २०१७ होती. दिनांक २ मे, २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता लिफाफा 'अ' (निविदा व इसारा किंमत) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात आले. एकूण तीन निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले. प्राप्त झालेल्या ई-निविदाकारांचे लिफाफे "अ" व "ब" DMRC ला मुल्यमापन करण्याकरीता पाठविण्यात आले. DMRC, यांनी त्यांचा तांत्रिक छाननी अहवाल प्राधिकरणास दिनांक २८ जून, २०१७ रोजी सादर केला. अहवालानुसार निविदाकारांच्या प्राप्त गुणांचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | प्राप्त तांत्रिक गुण (७५००) |
|---|---|---|
| १ | Consortium of M/s DB Engineering & Consulting GmbH with Hill International Inc. and Louis Berger Consulting Company Limited | ६९०६.४७ (९२.०८%) |
| २ | Consortium of M/s Ayesa Ingenieria Y Arquirecture SAU, Spain with Korea Rail Network Authority, Korea and Ayesa India Pvt Ltd. | ७०३१.०१ (९३.७५%) |
| ३ | Consortium of M/s SYSTRA with AECOM Middle East Limited and Consulting Engineers Group Limited | ७१४८.२८ (९५.३१%) |

८.३ निविदा प्रस्तावात नमूद खंड २०.१.२ अन्वये ज्या निविदाकारांचे तांत्रिक प्रस्तावाला ८०% वा त्यापेक्षा जास्त गुण मिळतील त्यांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्यात येतील. तांत्रिक निकषांनुसार तिन्ही निविदाकारांना ८०% पेक्षा जास्त गुण मिळाले असून तिन्ही निविदाकार तांत्रिकदृष्टया निविदेतील अटींप्रमाणे आर्थिक प्रस्ताव उघडण्यास पात्र होतात.

८.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निविदा शिफारस समिती गठीत केली असून यामध्ये १) संचालक (प्रकल्प) – मेट्रो, २) वित्त सल्लागार, ३) प्रमुख, नियोजन विभाग, ४) मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा समावेश आहे. DMRC यांचा अहवाल निविदा शिफारस समितीपुढे दिनांक १४ जुलै, २०१७ रोजीच्या पहिल्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला. निविदा शिफारस समितीने DMRC यांच्या अहवालास मान्यता दिली व तिन्ही पात्र निविदाकारांचे लिफाफा ‘क’ (आर्थिक प्रस्ताव) उघडण्याची शिफारस केली. महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने तिन्ही पात्र निविदाकारांचे लिफाफा ‘क’ (आर्थिक प्रस्ताव) दिनांक २७ जुले, २०१७ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. उघडलेल्या सर्व आर्थिक प्रस्तावांची छाननी DMRC मार्फत करण्यात आली. निविदेतील अटीनुसार प्रस्तावित General Consultancy अंतर्गत महत्वाच्या तांत्रिक पदांसाठी आंतरराष्ट्रीय तज्ञांचा समावेश असणे आवश्यक होते, यास्तव आर्थिक प्रस्ताव भारतीय चलन (रुपये) व विदेशी चलन (युरो/डॉलर/येन) या चलनांमध्ये मागविण्यात आले. प्राप्त वित्तीय प्रस्ताव (जीएसटी वगळता) खालीलप्रमाणे आहेत :-

| | | |
|---|---|---|
| १ | Consortium of M/s DB Engineering & Consulting GmbH with Hill International Inc. and Louis Berger Consulting Company Limited | ₹ २१७,६०,३९,७८० + € ६९,११,१०० + $ २४,७९,९२० |
| २ | Consortium of M/s Ayesa Ingenieria Y Arquirecture SAU, Spain with Korea Rail Network Authority, Korea and Ayesa India Pvt Ltd. | ₹ २४७,५४,६७,४५० + € २०,१६,६५५ + $ ५६,९५,९२५ |
| ३ | Consortium of M/s SYSTRA with AECOM Middle East Limited and Consulting Engineers Group Limited | ₹ २७३,६६,४०,५५० + € ६३,३४,२०० + $ ३२,३२,२१० |

८.५ प्राप्त वित्तीय प्रस्तावांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी भारतीय रुपयात रुपांतर करण्यात आले आहे. त्यासाठी अंतिम निविदा सादर तारखेच्या २८ दिवस आधीच्या म्हणजेच दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीचे विनिमय दर (१$ = ₹ ६५.७५ आणि १€ = ₹ ७१.३४) घेऊन प्राप्त आर्थिक प्रस्तावांचा रुपयात तपशील खालीलप्रमाणे :-

| | M/s. DB Engg. आणि समुह/संयुक्त उपक्रम | M/s. AYESA आणि समुह/संयुक्त उपक्रम | M/s. SYSTRA आणि समुह/संयुक्त उपक्रम |
|---|---|---|---|
| रुपये घटक | ₹ २१७,६०,३९,७८०/- | ₹ २४७,५४,६७,४५०/- | ₹ २७३,६६,४०,५५०/- |
| युरो घटक | € ६९,११,१००<br>(₹ ४९,३०,३७,८७४/-) | € २०,१६,६५५<br>(₹ १४,३८,६८,१६८/-) | € ६३,३४,२००<br>(₹ ४५,१८,८१,८२८/-) |
| डॉलर घटक | $ २४,७९,९२०<br>(₹ १६,३०,५४,७४०/-) | $ ५६,९५,९२५<br>(₹ ३७,४५,०७,०६९/-) | $ ३२,३२,२१०<br>(₹ २१,२५,१७,८०८/-) |
| एकूण | ₹ २८३,२१,३२,३९४/- | ₹ २९९,३८,४२,६८६/- | ₹ ३४०,१०,४०,१८६/- |

८.६ विनंती प्रस्तावास अनुसरुन तांत्रिक व वित्तीय प्रस्ताव संयुक्त करताना तांत्रिक निकषाला ७५% भार आणि आर्थिक निकषाला २५% भार देण्यात आले. त्याप्रमाणे प्राप्त संयुक्त गुण खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहेत :-

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | तांत्रिक गुण (७५००) | आर्थिक गुण (२५००) | संयुक्त गुण (१००००) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | Consortium of M/s. DB Engineering & Consulting GmbH with Hill International Inc. and Louis Berger Consulting Company Limited | ६९०६.४७ | २५०० | ९४०६.४७ | १ |
| २ | Consortium of M/s. Ayesa Ingenieria Y Arquirecture SAU, Spain with Korea Rail Network Authority, Korea and Ayesa India Pvt Ltd. | ७०३१.०१ | २३६४.९६ | ९३९५.९७ | २ |
| ३ | Consortium of M/s. SYSTRA with AECOM Middle East Limited and Consulting Engineers Group Limited | ७१४८.२८ | २०८१.८१ | ९२३०.०९ | ३ |

८.७ निविदेतील अटींनुसार तांत्रिक व वित्तीय निकषांत कमाल संयुक्त गुण संपादन करणाऱ्या सल्लागाराचा प्रस्ताव ग्राहय धरण्याची तरतूद आहे. त्यानुसार Consortium of M/s. DB Engineering & Consulting GmbH with Hill International Inc. and Louis Berger Consulting Company Limited यांना कमाल संयुक्त गुण मिळाले असून त्यांचा अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा (₹ ३३६.५५ कोटी च्या) १५.८५% कमी, ₹ २१७,६०,३९,७८०/- + € ६९,११,१०० + $ २४,७९,९२० + सेवा कर (₹ २८३,२१,३२,३९४/-) एवढया किंमतीचा देकार आहे. जो निव्वळ प्रकल्प किंमतीच्या (₹ ९,३४८.६२) सुमारे ३.०३ % आहे. निविदाकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा सुसंवादी व वाजवी असून, अंतिम अहवाल DMRC यांनी पुढील मान्यतेसाठी प्राधिकरणास सादर केलेला आहे. निविदा शिफारस समितीने DMRC यांच्या अंतिम अहवालास दिनांक ०४ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली असुन त्याअनुषंगाने निविदा स्विकारण्यास शिफारस केली आहे.

८.८ वरील प्रस्तावावर चर्चा करताना मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मे. DB Engineering & Consulting GmbH with Hill International Inc. and Louis Berger Consulting Company Limited यांच्याकडे मेट्रोच्या कामाचा अनुभव आहे का अशी विचारणा केली, यावर महानगर आयुक्त यांनी माहिती दिली की, मे. DB Engineering & Consulting GmbH with Hill International Inc. and Louis Berger Consulting Company Limited ही अनुभवी व विख्यात सल्लागार कंपनी असून त्यांनी अन्य देशातील मेट्रो प्रकल्पांकरीता सल्लागार सेवा दिल्या आहेत.

८.९ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मुंबई प्राधिकरणाच्या इतर मेट्रो मार्गाकरीता साधारण सल्लागार म्हणून मे. DB Engineering & Consulting GmbH with Hill International Inc. and Louis Berger Consulting Company Limited ही कंपनी काम करते आहे का अशी विचारणा केली, यावर खुलासा करताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, मेट्रो मार्ग २ अ DMRC मार्फत deposit work म्हणून सोपविण्यात आले असून मेट्रो मार्ग २B व ७ करीता मे. आयशा ही कंपनी साधारण सल्लागार असून मे. DB Engineering & Consulting GmbH with Hill International Inc. and Louis

Berger Consulting Company Limited हया कंपनीची फक्त मेट्रो मार्ग ४ करीता साधारण सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३३२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे "Consortium of M/s. DB Engineering & Consulting GmbH with Hill International Inc. and Louis Berger Consulting Company Limited" यांचा ₹ २१७,६०,३९,७८०/- + € ६९,११,१०० + $ २४,७९,९२० + जीएसटी (GST) एवढया किंमतीचा ई-निविदा देकार स्विकारण्यास व साधारण सल्लागार (GC) म्हणून नियुक्ती करण्यास तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास कार्यकारी समिती याव्दारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाची त्वरीत अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मंजूर असलेल्या संचालक (नियोजन) या पदाचे रुपांतरण संचालक (प्रकल्प /कामे) असे करण्याबाबत तसेच संचालक (प्रणाली) आणि मुख्य अभियंता (रेल पथ), मुख्य अभियंता (विद्युत) आणि मुख्य अभियंता (संकेत व दूरसंचार) या संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमास मान्यता देणेबाबत.**

९.१ महानगर आयुक्त यांनी या विषयासंदर्भात असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ व दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्राधिकरणाने मुंबई मेट्रो बृहत् आराखडयातील ११८ कि.मी. लांबीच्या मेट्रो

मार्गाची अंमलबजावणी करण्याकरीता तांत्रिक व अतांत्रिक अशा विविध संवर्गात एकूण २४२ इतकी पदे निर्माण करण्यासाठी मान्यता दिली. प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी रु.३७,४००-६७,०००+ग्रेड वेतन रु.१०,०००/- च्या वेतनश्रेणीत संचालक (प्रणाली), रु.३७,४००-६७,०००+ग्रेड वेतन रु.८,९००/- या वेतनश्रेणीमधील मुख्य अभियंता (रेलपथ), मुख्य अभियंता (विद्युत) आणि मुख्य अभियंता (संकेत व दूरसंचार) ही पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. या सर्व पदांची वेतनश्रेणी ग्रेड वेतन रु.८,९००/- व त्यापेक्षा अधिक असल्यामुळे सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमास कार्यकारी समितीची मान्यता आवश्यक आहे. त्यादृष्टीने सदर प्रस्ताव कार्यकारी समिती समोर सादर करण्यात आला आहे.

९.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीत संचालक (नियोजन) वेतनश्रेणी रु.३७,४००-६७,०००+ ग्रेड वेतन रु.१०,०००/- हे पद निर्माण करण्यात आले असून, त्यांच्या सेवाप्रवेश नियमास कार्यकारी समितीच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सदर पदाच्या पदनामात बदल करण्याचे प्रस्तावित असून, संचालक (नियोजन) या पदाचे पदनाम संचालक (प्रकल्प/कामे) असे करण्याचे व पदाच्या मंजूर झालेल्या सेवाप्रवेश नियमातील कमाल वयोमर्यादा ५८ दर्शविण्यात आली होती ती आता ५६ ठेवण्याचे प्रस्तावित आहे. तसेच संचालक (प्रणाली), मुख्य अभियंता (रेलपथ), मुख्य अभियंता (विद्युत) आणि मुख्य अभियंता (संकेत व दूरसंचार) या संवर्गातील पदे त्वरीत भरण्याच्यादृष्टीने सदर पदांचे प्रस्तावित सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले असून, त्यास मान्यता घेण्याकरीता कार्यकारी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

९.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, संचालक (प्रणाली), संचालक (प्रकल्प/कामे), मुख्य अभियंता (रेलपथ), मुख्य अभियंता (विद्युत) आणि मुख्य अभियंता (संकेत व दूरसंचार) ही पदे भरण्याच्या दृष्टीने निवड प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विभागीय निवड

..२२/-

समिती/पदोन्नती समिती स्थापन करणे आवश्यक असल्याने खालील समिती गठीत करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| (१) | महानगर आयुक्त | - अध्यक्ष |
| (२) | अति.महानगर आयुक्त (१), मुंमप्रविप्रा | - सदस्य |
| (३) | महाव्यवस्थापक (मध्य रेल्वे/पश्चिम रेल्वे) | - सदस्य |
| (४) | संचालक (प्रणाली), MMRCL | - सदस्य |
| (५) | संचालक (प्रकल्प), मुंमप्रविप्रा | - सदस्य |
| (६) | मुख्य अभियंता (अभियांत्रिकी विभाग), मुंमप्रविप्रा | - सदस्य |
| (७) | उप महानगर आयुक्त (प्रशासन), मुंमप्रविप्रा | - सचिव |

**निर्णय :-** **वरील चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३३३ :**

"**असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३)(एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे,

१) संचालक (नियोजन) या पदाचे पदनाम संचालक (प्रकल्प/कामे) असा बदल करण्यास तसेच यापूर्वी मंजूर केलेल्या सेवाप्रवेश नियमातील कमाल वयोमर्यादा ५८ वरुन ५६ अशी करण्यास याद्वारे मान्यता देत आहे. तसेच

२) संचालक (प्रणाली), मुख्य अभियंता (रेलपथ), मुख्य अभियंता (विद्युत) व मुख्य अभियंता (संकेत व दूरसंचार) या संवर्गातील पदांचे बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये प्रस्तावित केलेल्या सेवाप्रवेश नियमास आणि उपरोक्त परिच्छेद क्र.९.३ मध्ये प्रस्तावित केलेल्या विभागीय पदोन्नती/निवड समितीस याद्वारे मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर पदे भरण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

..२३/-

**बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी अत्याधुनिक पध्दतीची कार्यालयीन इमारत व निवासी इमारत बांधणे.**
**- मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास व अतिरिक्त बाबी तसेच इमारतीसाठी आवश्यक असलेल्या फर्निचर, विद्युतीकरण, उदवाहने व वातानुकुलीत यंत्रणा इ. सेवाविषयक एकत्रित कामांसाठी प्राधिकरणाकडून सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शिफारस करणेबाबत.**

१०.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर प्रस्ताव हा कार्यकारी समितीच्या दिनांक २०.०९.२०१६ रोजी झालेल्या २५०व्या बैठकीत तसेच दिनांक २६.०५.२०१७ रोजी झालेल्या २५३व्या बैठकीत कार्योत्तर सुधारित प्रशासकीय मान्यता प्राधिकरणाकडून घेण्यास शिफारशीस्तव कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात आलेला होता. तथापि, कार्यकारी समितीच्या २५३व्या बैठकीत चर्चेअंती, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर प्रस्ताव हा पुन:श्च आजच्या बैठकीत प्राधिकरणास शिफारशीस्तव समितीपुढे सादर करण्यात आलेला आहे.

१०.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदर प्रस्ताव मान्य न झाल्याने ठेकेदाराची व सल्लागाराची अंतिम देयके अदा करण्यास अडचणी येत आहेत तसेच ठेकेदाराने वादग्रस्त बाबी (Disputed Item / Amount) व देयक अदा करणेस झालेल्या विलंबापोटी (Interest towards delayed payments) रु.९.०० कोटी पेक्षा जास्त रक्कम दावा / प्रतिपादन म्हणून सादर केलेली आहे. सबब सदर प्रस्ताव लवकरात लवकर प्राधिकरणास शिफारस करणे निकडीचे झालेले आहे असे स्पष्ट केले.

१०.३ चर्चेअंती, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सांगितले की, सदर प्रस्तावाकरीता प्राधिकरणाच्या नविन कार्यालयीन इमारतीत लवकरात लवकर विशेष बैठक आयोजित करावी.

**बाब क्र.११ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वेगवेगळया ठिकाणी असलेल्या मिळकतींच्या व मालमत्तांच्या व्यवस्थापनाकरीता संस्थेची तीन वर्षे कालावधीसाठी नेमणूक करण्याबाबत.**

११.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या मालमत्तेच्या व मिळकतीच्या व्यवस्थापनाकरीता नियुक्त करण्यात आलेल्या संस्थांचा नियुक्ती कालावधी

दिनांक ३१ मे, २०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने प्राधिकरणाने सकाळ व हिंदुस्थान टाइम्स या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०९ एप्रिल, २०१७ रोजी निविदा / सुचना प्रकाशित करुन दिनांक १० एप्रिल, २०१७ पासून निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेत ७०% गुण हे तांत्रिक गुणवत्तेकरीता व ३०% गुण वित्तीय गुणवत्तेकरीता आधारित केले होते. प्राप्त झालेल्या निविदाकारांचा लिफाफा - "अ" (निविदा शुल्क व इसारा रक्कम) दिनांक ३१/०५/२०१७ रोजी उघडल्यानंतर निविदा शुल्क व इसारा रक्कम भरावयाची खात्री करुन खालील निविदाकारांच्या निविदा उघडण्यात आले :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव |
|---|---|
| १. | मे. विशाल प्रोटेक्शन फोर्स. |
| २. | मे. सिंग इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा. लि. |
| ३. | मे. बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि. |
| ४. | मे. टॉप्स सिक्युरिटी लि. |
| ५. | मे. ईगल सिक्युरिटी ॲण्ड पर्सोनेल सर्व्हिसेस. |
| ६. | मे. जीके सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा. लि. |
| ७. | मे. क्लिअर सिक्युअर्ड सर्व्हिसेस प्रा.लि. |

११.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, निविदाकारांनी सादर केलेल्या पात्रता प्रस्तावाची छाननी केली असता, उपरोक्त तक्त्यामधील निविदाकारापैकी अनु क्र. (७) चे निविदाकार मे. क्लिअर सिक्युअर्ड सर्व्हिसेस प्रा. लि. वगळता उर्वरित सर्व निविदाकार पात्रतेच्या अटी पूर्ण करीत आहेत. सदर पात्र निविदाकारांना निविदा छाननी समिती समोर सादरीकरण करण्यास सांगण्यात आले. त्याप्रमाणे दिनांक ३०/०६/२०१७ रोजी संबंधीत निविदाकारांचे निविदा छाननी समिती समोर सादरीकरण करण्यात येऊन निविदा छाननी समितीने संबंधीत संस्थांना पात्रतेच्या प्रस्तावाबाबत दिलेल्या गुणाबाबतचा अहवाल बाब टिप्पणी सोबतच्या **जोडपत्र-इ** प्रमाणे सादर केला आहे. या अहवालानुसार सर्व निविदाकार ७० व त्या पेक्षा अधिक गुण प्राप्त करीत असल्याने निविदातील अटी / शर्तीनुसार सर्वच निविदाकार त्यांचा लिफाफा-"क" मधील वित्तीय

प्रस्ताव उघडण्यास पात्र ठरत असल्याने दिनांक ०४/०८/२०१७ रोजी त्यांचा लिफाफा-क मधील वित्तीय प्रस्ताव उघडण्यात आले. निविदाकरांनी खालीलप्रमाणे दर निविदित केले आहेत :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | निविदित केलेला दर | |
|---|---|---|---|
| | | पर्यवेक्षक दर (रु.) | परिकर दर (रु.) |
| १. | मे. विशाल प्रोटेक्शन फोर्स. | १५,०७९/- | १४,४१३/- |
| २. | मे. सिंग इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा. लि. | १५,०६१/- | १४,३९६/- |
| ३. | मे. बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी इंडिया लि. | १५,०९५/- | १४,४२८/- |
| ४. | मे. टॉप्स सिक्युरिटी लि. | १५,९०३/- | १५,२२६/- |
| ५. | मे. ईगल सिक्युरिटी ॲण्ड पर्सोनेल सर्व्हिसेस. | १५,०८८/- | १४,४२१/- |
| ६. | मे. जीके सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा. लि. | १३,८००/- | १३,२१७/- |

११.३ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, निविदा पत्रकातील व निविदा पूर्व बैठकीच्या कार्यवृत्तातील तरतुदीनुसार, पात्रता प्रस्ताव आणि वित्तीय प्रस्तावाकरीता मिळालेल्या गुणांना अनुक्रमे ७०% व ३०% या प्रमाणात एकत्र केले असता, एकूण १०० गुणांपैकी प्राप्त निविदाकारांना बाब टिप्पणीच्या परि.-१० मध्ये नमूद केल्यानुसार गुण प्राप्त होतात. याप्रमाणे पर्यवेक्षक व परिकर प्रवर्गासाठी मे. बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी इंडिया लि. यांना सर्वात अधिक प्रत्येकी अनुक्रमे ९५.३३ व ९५.३८ गुण प्राप्त होतात. तथापि, निविदाकारांपैकी मे. जीके सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा. लि. यांनी न्युन्यत्तम दर निविदित केला आहे. त्यामुळे, खालीलप्रमाणे निविदित केलेले न्युन्यत्तम दर स्विकारणे आवश्यक आहे :-

| अ.क्र. | प्रवर्ग | निविदा दर (रु.) |
|---|---|---|
| १. | पर्यवेक्षक | १३,८००/- |
| २. | परिकर | १३,२१७/- |

QCBS निविदा प्रक्रियेनुसार मे. बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं.) लि. पात्रतेच्या निकषावर अनु. क्र. १ वर असून, त्यांनी निविदीत केलेला दर हा उच्चतम आहे. प्राधिकरणास एकापेक्षा अधिक संस्थांच्या सेवेची आवश्यकता असून, इतर ५ पात्र संस्थांची नेमणूक करता येईल. निविदा

पत्रकातील अटी व शर्तीनुसार, मे. जीके सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा. लि. यांनी निविदीत केलेला न्युन्यत्तम दर पर्यवेक्षक रु. १३,८००/- व परिकर रु. १३,२१७/- स्विकारणे आवश्यक असून, इतर ५ संस्थांना सदरचे दर मान्य असल्यास त्याचीही नेमणूक पुढील ३ वर्ष कालावधीसाठी करता येईल.

११.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मालमत्तेच्या व मिळकतीच्या परिरक्षणाची बाब विचारात घेता, निविदा प्रक्रियेदरम्यान यापूर्वी नियुक्त केलेल्या संस्थांचा नेमणूक कालावधी दिनांक ३१ मे, २०१७ रोजी संपला असल्याने या संस्थांचा नियुक्ती कालावधी सध्याची चालू असलेली निविदा प्रक्रिया पूर्ण करुन नव्याने संस्थांची नियुक्ती करेपर्यंत वाढविणे क्रमप्राप्त आहे. सबब, सदरची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन नव्याने संस्थांची नियुक्ती करेपर्यंत या संस्थांना नियुक्ती कालावधीत मुदतवाढ देण्यात आली असून त्यास कार्योत्तर मंजुरी देण्याची विनंती केली आहे.

११.५ उपरोक्त प्रस्तावाबाबत प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीचे सदस्य श्री. अजोय मेहता, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्राधिकरणाच्या मालमत्ता व मिळकतीच्या परिरक्षणार्थ मागणी केलेल्या निविदेमध्ये किमान वेतन अधिनियम, १९४८ व वैधानिक तरतुदीनुसार अनुज्ञेय असलेल्या इतर सर्व भत्यानुसार दर मागविण्यात आले होते. त्यानुसार, नेमणूक करण्यात येणाऱ्या संस्थाच्या पर्यवेक्षक व परिकरांना देण्यात येणारे वेतन हे धनादेश / आर. टी. जी. एस. द्वारे नियुक्त संस्थेमार्फत पर्यवेक्षक व परिकरांना देण्यात यावे अशी सुचना केली. या बाबतीत महानगर आयुक्त यांनी चालु निविदा कालावधित याबाबत आवश्यक ती उपाययोजना केली जाईल, असे प्रतिपादन केले.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३३४ :-**

"**असा ठराव करण्यात येतो की,** मुंबई महानगर प्रदेश विकास अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे

..२७/-

(१) मे. बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि., (२) मे. विशाल प्रोटेक्शन फोर्स, (३) मे. सिंग इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा. लि., (४) मे. जीके सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा. लि. (५) मे. ईगल सिक्युरिटी ऍन्ड पसोर्नेल सर्व्हिस, (६) मे. टॉप्स सिक्युरीटी लि. या संस्थांची रु. १३,८००/- प्रति पर्यवेक्षक व रु. १३,२१७/- प्रति परिकर (Attendant) प्रति माह सर्व अनुषंगिक भत्ते, सवलती / फायदे (कर वगळून) व किमान वेतन अधिनियम, १९४८ अन्वये वाढीव भत्त्यामध्ये (DA) होणाऱ्या सुधारणेनुसार सदरचा दर त्याप्रमाणे सुधारीत करण्याचा अधिन राहुन ३ वर्षासाठी निविदेतील अटी व शर्तीबर हुकुम व अनु.क्र. (१) ते (६) या निविदाकारांचा या दराने देकार स्विकारण्याच्या अधिन राहून नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे. जर काही निविदाकारांनी देकार स्विकारण्यास असमर्थता दर्शविल्यास असे निविदाकार वगळून उर्वरित निविदाकारांची नेमणूक करण्यात यावी. तसेच, नियुक्त केलेल्या संस्थांमार्फत ठेवण्यात आलेल्या पर्यवेक्षक व परिकर यांना नियुक्त केलेल्या संस्थेने वेतन हे धनादेश / आर. टी. जी. एस. द्वारे देण्यात यावे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समितीने ठराव क्र. १२५४, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१४ अन्वये प्राधिकरणाच्या मालमत्तेचे व्यवस्थापन व परिरक्षण करण्यासाठी नियुक्ती करण्यास मान्यता दिलेल्या संस्थांचा नियुक्ती कालावधी दिनांक १ जून, २०१७ पासून उपरोक्त प्रमाणे मान्यता दिल्यानुसार नविन संस्थांची नियुक्ती करेपर्यंत सध्याच्याच अटी व शर्तीवर वाढविण्यास मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यास व त्यास आवश्यक असलेले मनुष्यबळ वेळोवेळी आवश्यकतेनुसार फेरफार करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.१२ : प्राधिकरणाचे दिनांक ३० जून, २०१७ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

१२.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २०१७ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय : प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**<u>बाब क्र.१३ :</u>** **<u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक ०१ एप्रिल, २०१७ ते ३० जून, २०१७</u>**

१३.१ दिनांक ०१ एप्रिल, २०१७ ते ३० जून, २०१७ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विविध बँका / वित्तीय संस्था यामध्ये केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>निर्णय :</u>** **<u>सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.</u>**

**<u>बाब क्र.१४ :</u>** **<u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ ते ३१ मार्च, २०१६</u>**

१४.१ मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ ते ३१ मार्च, २०१७ रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>निर्णय :</u>** **<u>सदरहू सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.</u>**

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**********